# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### हिंगोली जिल्हा परिषदेतंर्गत जिल्हा नियोजन समितीने केलेल्या नियोजनानुसार जनसुविधा योजनेच्या कामांना प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत

**(१) २२६४० (१४-०८-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा परिषदेतंर्गत सन २०१४-१५ या वर्षात जिल्हा नियोजन समितीने केलेल्या नियोजनानुसार जनसुविधा योजनेच्या कामांना अद्यापही प्रशासकीय मंजूरी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामांना अद्यापही प्रशासकीय मंजूरी न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर कामांना किती कालावधीत प्रशासकीय मंजुरी देण्यात येईल ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१६) :**(१) नाही.

(२) व (३) सन २०१४-१५ मधील शिल्लक निधी रु.१२२.०० लक्ष व २०१५-१६ या वर्षातील उपलब्ध निधीच्या दिड पट रु.३७८.७५ लक्ष अशा एकूण रु.५००.७५ लक्ष मधून सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षात मंजूर १०२ कामांना दि.११/१२/२०१५ च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. यापैकी २४ कामे पूर्ण झालेली असून उर्वरीत कामे ३१/०३/२०१७ पर्यंत पूर्ण होतील.

---

### खालापूर (जि.रायगड) येथील कलोते धरणातून ॲडलॅब इमॅजिका पार्कमध्ये लाखो लिटर पाण्याचा उपसा केला जात असल्याबाबत

**(२) ३३५४६ (१६-०१-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) येथील कलोते धरणातून ॲडलॅब इमॅजिका पार्कमध्ये नव्याने तयार होत असलेल्या वॉटर पार्कसाठी जलवाहिनी टाकून पाणी नेण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खालापूर तालुक्यातील शेतकरी, ग्रामस्थाना पाणी न देता ॲडलॅबला पाणी देण्याचे कारण काय आहे,
(३) असल्यास, रोज लाखो लिटर पाण्याचा उपसा कलोते धरणातून होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत खालापूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंच यांच्यासह सर्व सदस्यांनी ॲडलॅब पार्कला पाणी देण्यास विरोध असल्याचे निवेदन तहसिलदारांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१२-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) बिगर सिंचनासाठी मागणीनुसार सक्षम स्तरावर मान्यता दिली जाते. त्याचप्रमाणे ॲडलॅबला ०.४१ दलघमी पाणी वापराची मान्यता दिली आहे.
(३) ॲडलॅब कंपनीतर्फे धरणातून रोज १.५० दशलक्ष लीटर प्रतिदन इतका पाणी उपसा अपेक्षित आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.
दि.१६/१/२०१५ रोजी खालपूर ग्रामस्थ व शेतकरी यांनी तहसीलदार खालापूर यांना यासंबंधीचे निवेदन सादर केले आहे.
(५) स्थानिक गरजेनुसार सिंचनासाठी व पिण्यासाठी लागणारे आवश्यक पाणी राखीव ठेवूनच उर्वरीत पाणीसाठ्यातून ॲडलॅब साठी शासनाने पाणी मंजूरी दिलेली असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हदगाव (जि.नांदेड) तालुक्यात पंचायत समितीकडून मंजूरी मिळालेल्या तळ्यांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३) ३३९७२ (१६-०१-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हदगाव (जि.नांदेड) तालुक्यात पंचायत समितीकडून गत वर्षात ३७ तळयांना मंजूरी मिळाली परंतु निम्मे तळयांची कामे अपुर्णावस्थेत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपुर्णावस्थेत असलेल्या तळयांची कामे पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२७-१२-२०१६) :**(१) पंचायत समिती, हदगाव मार्फत रोजगार हमी योजने अंतर्गत ३७ शेततळ्यांना मंजूरी देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत १२ शेततळे मजुराअभावी अपूर्ण आहेत व मजूरांनी काम मागणी न केल्यामुळे २५ शेततळ्यांची कामे अद्याप सुरु करण्यात आलेली नाहीत. मजुरांची कामाची मागणी येताच शेततळ्यांची कामे करण्यात येतील.
(२) ग्रामसेवक यांचेकडून काम मागणी अर्ज मागविण्यात येत आहेत. मजूरांची काम मागणी लक्षात घेऊन उपलब्ध असलेला शेल्फ व अपूर्ण कामे करुन घेण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी तत्वावर बांधलेल्या आठ बंधारे निधीअभावी नादुरुस्त असल्याबाबत**

**(४) ३४२१० (२९-०१-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी तत्वावर बांधलेल्या आठ बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी ७६ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून सदरचा निधी अद्याप न मिळाल्यामुळे हे बंधारे नादुरुस्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा निधी अद्यापही न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, हा निधी तातडीने उपलब्ध करुन देऊन हे काम केव्हापर्यंत पूर्ण करण्याचे अपेक्षित आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१५-१२-२०१६) :**(१), (२) व (३) अंशत: खरे आहे.
कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सहकारी तत्वावर आठ को.प.बंधारे बांधले आहेत. त्यापैकी ठाणे-आळवे बंधाऱ्यास रु.८.२९ लक्ष निधी यापुर्वीच वितरीत करण्यात आला असून उर्वरीत सात को.प. बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी रु.६४.९५ लक्ष अनुदानास मान्यता देण्यात आली आहे. सदर सात बंधाऱ्यांच्या दुरुस्तीकरिता संबंधीत संस्थांना जानेवारी २०१६ मध्ये ५०% निधी वितरीत केला आहे. उर्वरित निधी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात उपलब्ध करुन देण्याचे नियोजित आहे.

---

**मानोरा (जि.वाशिम) येथील पंचायत समिती स्तरावरुन विशेष घटक योजनेंतर्गत अनुदानावर वाटप करण्यात आलेली बैलगाडी अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याबाबत**

**(५) ३६१८३ (२९-०१-२०१६). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानोरा, जि.वाशिम येथील पंचायत समिती स्तरावरुन विशेष घटक योजने अंतर्गत सन २०१५ मध्ये अनुदानावर वाटप करण्यात आलेली बैलगाडी अत्यंत निकृष्ट दर्जाची असून त्याबाबत चौकशी करुन संबंधित अधिका-यांविरुध्द कारवाई करुन झालेल्या गैरव्यवहाराच्या

रकमेची वसुली शासनाकडे जमा करण्यात यावी अशी मागणी हिरवा बु. चे उपसंरपंच नरेश भगत यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांच्याकडे दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद प्रशासनामार्फत या संबंधी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२४-१०-२०१६)** :(१) होय.

याबाबत श्री.नरेश विश्वंभर भगत, उपसरपंच, हिवरा बु. यांनी दिनांक ११.०९.२०१५ व १६.१०.२०१५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडे विशेष घटक योजने अंतर्गत वाटप केलेल्या बैलगाडीच्या गुणवत्तेबाबत तक्रार केली आहे.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा कृषी अधिकारी (विघयो) यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली. सदर चौकशीमध्ये बैलगाड्यांचे वजन २००-२१० कि.ग्रॅ. आढळून आलेले आहे. झालेला पुरवठा योग्य असल्याचा व तक्रारीत तत्थ्य नसल्याचा अहवाल जिल्हा कृषी अधिकारी (विघयो) यांच्याकडून जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, वाशिम यांना सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाटण (जि.सातारा) तालुक्यातील पवनचक्की प्रकल्पामुळे रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(६) ३६९०९ (२९-०१-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटणा (जि.सातारा) तालुक्यात मोठया प्रमाणात उभारण्यात येणाऱ्या पवनऊर्जा प्रकल्पातील कंपन्याची प्रकल्पाकरीता लागणाऱ्या अवजड साहित्यांची वाहतूक तालुक्यातील जिल्हा परीषदेच्या व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावरुन नेल्याने सदरचे रस्त्यांचे सुमारे २५ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुक्यातील प्रमुख रस्त्यांची दुरवस्था करुन संबंधित कंपन्यानी नुकसान भरपाई म्हणून जिल्हा परिषद, सातारा यांचेकडे केवळ ३० लाख रुपये नुकसानीची अनामत रक्कम जमा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, रस्त्यांचा कंपन्यानी केलेला वापर, नुकसान झालेल्या रस्त्यांची लांबी, व नुकसानीचे अंदाजपत्रक याचा विचार करुन खराब झालेल्या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-१२-२०१६) :**(१) होय.

(२) सन २००७-०८ मध्ये पवन उर्जा कंपन्याची जिल्हा परिषद, सातारा यांचेकडे नुकसान भरपाई म्हणून रु.२६.२५ लक्षची अनामत रक्कम जमा केली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

खराब झालेल्या रस्त्यांपैकी काही रस्त्यांची दुरुस्ती करुन ते सुस्थितीत आणण्यासाठी सुमारे ११.१५ कोटी इतका खर्च येणे अपेक्षित आहे. यासाठी आवश्यक निधी उर्जा विकास अभिकरणाकडून प्राप्त झाला असून कामांच्या निविदा बोलावण्यात आल्या आहेत. उर्वरीत रस्त्याच्या दुरुस्तीची कामे मंजूरी निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## यवतमाळ जिल्हा परिषदेकडून झरी जामणी तालुकयातील ग्रामपंचायतींना दलित वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत सौर दिवे देण्याबाबत

**(७) ३७०४६ (२९-०१-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेकडून झरी जामणी तालुकयातील झरी, माथार्जुन, पाटण, मुकूटबन, आडेगाव, मांगली, गणेशपूर, खडकी, पिंप्रड आदी ग्रामपंचायतींना दलित वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत सौर दिव्यांचा पुरवठा करण्यात आला होता मात्र त्यातील सर्वच दिवे बंद अवस्थेत असल्याने शासनाची ही योजना अयशस्वी ठरल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व सदरहू योजनेतील दिवे बंद अवस्थेत असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर दिवे दुरुस्त करुन त्याचा लाभ दलित वस्तींना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-१२-२०१६) :**(१) नाही.

दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन २०१०-११ मध्ये मुकूटबन, पाटण, आडेगाव व मांगली या ४ ग्रामपंचायती मध्ये एकूण ४० सौरपथ दिवे स्थापित करण्यात आले असून मुकूटबन येथील सर्व सौरपथ दिवे सुरु आहेत. पाटण, अडेगांव व मांगली येथील सौरपथ दिवे बंद पडलेली असल्याचे आढळून आले.

(२) होय.

(३) सौरपथ दिव्यांच्या बॅटरी मधील डिस्टील वॉटर नियमित न टाकणे, बॅटरी चोरी होणे तथा देखभाली संदर्भातील बाबतचे तांत्रिक ज्ञान ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नसणे इत्यादी कारणांमुळे पाटण, आडेगाव व मांगली येथील सौरपथ दिवे बंद अवस्थेत असल्याचे दिसून आले.

(४) पाटण, आडेगाव व मांगली येथील सौरपथ दिवे दुरुस्त करण्याबाबत संबंधित ग्रामपंचायतीला निर्देश देण्यात आलेले आहेत.

---

**शिरोशी ग्रुपग्रामपंचायती (ता.जव्हार, जि.पालघर) मध्ये**
**इंदिरा आवास घरकुल योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(८) ३८०३० (२९-०१-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोशी ग्रुप ग्रामपंचायती मध्ये इंदिरा आवास घरकुल योजनेमध्ये प्रतिक्षा यादीत नावे समाविष्ट असणाऱ्या लाभार्थ्यांना डावलून प्रतीक्षा यादीत नावे नसतानादेखील अनेकांना घरकुलांचा लाभ देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, योजनेत काही मृत व्यक्तींच्या नावाने घरकुले देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-१२-२०१६) :**(१) व (२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिखली बु. (जि.वाशिम) ग्रामपंचायत परिसरात वस्ती व लोकसंख्या वाढल्याने या नवीन भागासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्याबाबत**

**(९) ३८१३५ (२९-०१-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली बु. (जि.वाशिम) ग्रामपंचायत परिसरात वस्ती व लोकसंख्या वाढल्याने या नवीन भागासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्याबाबत ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेने सुध्दा ठराव केले असल्याचे माहे नाव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिखली बु.या. ग्रामपंचायतीचे विभाजन करुन येथील नवीन वसाहतीला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-१२-२०१६)** :(१) हे खरे नाही. चिखली बु. ग्रामपंचायतीच्या विभाजनाबाबत ग्रामपंचायतीने अथवा जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने ठराव मंजूर केलेला नाही.

तथापि, चिखली बु. ग्रामपंचायतीच्या विभाजनास चिखली बु. येथील ग्रामसभेने दि.२५/११/२०११ रोजीच्या सभेत ठराव क्र.५/१ अन्वये मंजूरी दिलेली आहे.

(२) व (३) चिखली बु. या ग्रामपंचायतीचे विभाजन करुन ज्या वसाहतीसाठी (सुंदरवाटीका व इतर क्षेत्र) स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्या वसाहतीला महसूली गावाचा दर्जा प्राप्त नसल्यामुळे दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ च्या शासन निर्णयातील निकषानुसार सदर ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करता येत नाही.

---

## पिंपळवाडी, गांगवाडी (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथील कामांना प्रशासकीय मान्यता देऊन त्यावर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) ३८१७१ (२९-०१-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी परिक्षेत्रातील पिंपळवाडी, गांगवाडी (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथे कोल्हापूर पध्दतीचा बंधारा, सुदी येथे पाझर तलाव, सावळद १,२,३,४ येथे गावतलाव या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन त्यावर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.आदिवासी विकास मंत्री यांना माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त सिंचनाच्या कामांना आदिवासी विकास योजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१२-१२-२०१६)** :(१) होय.

(२) पिंपळवाडी कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांच्या कामाचे अंदाजपत्रक मुख्य अभियंता, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर यांचेकडून प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास दिनांक २०/०८/२०१४ रोजी प्राप्त झालेला आहे. गांगवाडी कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे सर्व्हेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करणेबाबत कार्यवाही सुरु आहे. सुदी येथील पाझर तलावाचे सर्व्हेक्षण करण्याची कार्यवाही उपविभागाकडून करण्यात येत आहे. सर्व्हेक्षण झाल्यानंतर अंदाजपत्रक तयार करण्यात येईल. सावळद सावठण तलाव १, २, ३, ४ हे प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास प्राप्त झालेले असून सदर प्रस्तावांबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रशासकीय मान्यतेबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

**राजापूर (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या जुन्या इमारतीची जागा वापराविना पडून असल्याबाबत**

**(११) ४४०५२ (१०-०५-२०१६). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या जुन्या इमारतीची जागा वापराविना पडून असून त्याठिकाणी मोकाट जनावरे, भटक्या कुत्र्यांचे वस्तीस्थान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत नगरपालिकेला हस्तांतरित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधिताकडे सातत्याने पत्रव्यवहार करुनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त इमारत नगरपालिकेला हस्तांतरित करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६) :**(१) राजापूर (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या जुन्या इमारतीची जागा वापराविना पडून असल्याची बाब खरी आहे. तथापि, त्याठिकाणी मोकाट जनावरे, भटक्या कुत्र्यांचे वस्तीस्थापन झाले ही बाब खरी नाही.

(२), (३) व (४) याबाबत क्षेत्रीय स्तरावरुन प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत शासनस्तरावरुन निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील पाली-भुतिवली धरणाच्या पाण्याचा गैरवापर होत असल्याबाबत**

**(१२) ४४६५५ (२९-०४-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील पाली-भुतिवली धरणाचे पाणी शेतीला न देता १० वर्षापासून बिल्डर वापरीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार सदर धरणाचे पाणी शेतीला न देता बिल्डरला देणाऱ्या अधिका-यांवर व बिल्डरवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-११-२०१६) :**(१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) या प्रकलपाच्या मंजूर प्रकल्प अहवालानुसार सिंचनासाठी १२.१२५ दलघमी व पिण्यासाठी ०.४२५ दलघमी इतका पाणीसाठा राखीव आहे. मौजे गारपोली येथील मे.पोद्दार डेव्हलपर्स यांच्या नागरी वसाहतीसाठी दि. १५/१२/२०१० ते दि. १४/१२/२०१६ ह्या ६ वर्षाच्या कालावधी करिता पालीभूतावली धरणाच्या जलाशयातून १.२ दललि/दिन (०.४३८ दलघमी/वार्षिक) घरगुती पाणी पुरवठ्यासाठी दिनंक ३०/११/२०१० अन्वये तात्पुरते आरक्षण मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार हा पाणी पुरवठा करण्यात येत आहे. भूसंपादनाअभावी कालव्याची कामे अपूर्ण असल्याने सिंचन करता येत नाही. तथापि ग्रामस्थांच्या मागणी नुसार नदीलगतच्या लाभ क्षेत्रात सन २०१६ च्या रब्बी हंगामात शेतीसाठी पाणी सोडण्यात आले आहे.

मे. मोद्दार डेव्हलपर्स यांच्या नागरी वसाहतीसाठी सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे सिंचनावर काहीही परिणाम झालेला नाही.

(३) पाली-भुतावली धरणातून तात्पुरते पिण्यासाठी पाणी आरक्षण मंजूर असून बिल्डरवर व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रामटेक (जि.नागपूर) गढमंदिर जवळ असलेले राजकमल**
**रिसोर्ट (ए.टी.डी.सी.) स्थलांतर करणेबाबत**

**(१३) ४५५५१ (२०-०५-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) गढमंदिर जवळ असलेले राजकमल रिसोर्ट (ए.टी.डी.सी.) अंतर्गत बियरबारचे स्थलांतर खिंडसी पर्यटन स्थळामध्ये करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२२-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) मा.स्थानिक लोकप्रतिनिधी रामटेक विधानसभा मतदार संघ जिल्हा नागपूर यांनी त्यांच्या दि.१५/७/२०१५ च्या पत्रान्वये महामंडळाच्या पर्यटक निवासातील मांसहार व बियर बार बंद करावा व त्याला दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत करावे व रामटेक ची धार्मिक गरिमा जपण्यास सहकार्य करावे अशी विनंती केली आहे. सदर मागणीबाबत भाडेपट्टेधारक यांची दि.५/१२/२०१५ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणी अंती जिल्हाधिकारी, नागपूर यांना दि.१७/१२/२०१५ रोजीच्या पत्रान्वये या संदर्भात योग्य ती चौकशी करुन सदर तक्रारी मध्ये तथ्य आढळून आल्यास सदर परवाना महमंडळाच्या नागपूर जिल्ह्यातील इतर पर्यटक निवासाकरिता वापरण्याची परवानगी द्यावी. तसेच सदर पर्यटक निवासात मासांहार विक्रीस खाद्यपदार्थ परवानामध्ये प्रतिबंधित करण्याकरिता परिक्षण करुन आवश्यकता भासल्यास अशी अट अंतर्भूत करुन सुधारीत खाद्यपरवाना निर्गमित करावा असे कळविण्यात आलेले आहे.

जिल्हाधिकारी, नागपूर यांनी त्यांच्या दि.२५/४/२०१६ रोजीच्या आदेशात सदर जमिनीची जागा वनविभागाची असल्याने वन विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यंत FL III चा परवाना निलंबित करण्यात आलेला आहे असे कळविले आहे.

तसेच मा.स्थानिक लोकप्रतिनिधी रामटेक विधानसभा मतदार संघ जिल्हा नागपूर यांना त्यांच्या दि.१६/१२/२०१५ च्या पत्रान्वये गडमंदिर जवळ असलेले राजकमल रिसॉर्ट (मपविम) अंतर्गत बियरबार तेथून बाजूला असलेले खिंडशी पर्यटन स्थळामध्ये हलविण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत विनंती केली आहे. त्यानुसार तत्कालिन मा.राज्यमंत्री (पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१८/१२/२०१५ रोजी मे राजकमल टुरिस्ट कॉम्प्लेक्स बाबत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत तत्कालिन मा.राज्यमंत्री महोदयांनी सदरची बाब संचालक मंडळापुढे सादर करण्याबाबत निर्देशित केले त्यानुसार संचालक मंडळाच्या दि.१८/१/२०१६ रोजी झालेल्या १४८ व्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात आला. संचालक मंडळाने याबाबत कायदेशीर सल्ला घेण्याचा निर्णय दिला.

त्यानुसार महामंडळाच्या विधी शाखेने मा.महाधिवक्ता (Advocate General) यांच्याकडे कायदेशीर सल्ला मागितला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील पंचायत समिती चिखली येथील**
**सामान्य निधीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(१४) ४६१६५ (३०-०४-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील पंचायत समिती चिखली येथील सन २०१२-१३ पुर्वी निदर्शनास आलेले सामान्य निधीची १६ प्रकरणे आणि योजनेचे ८ अशी २४ प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२-१३ पुर्वीची प्रकरणे असून सुध्दा अद्यापही निकाली काढण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-१२-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सन २०१२-१३ पुर्वीची सामान्य निधीची १६ प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून त्यातील १० प्रकरणे नस्तीबध्द करण्यात आली आहेत. त्यामध्ये रु. ८५,७३३/- इतकी रक्कम वसूल केली आहे. उर्वरित प्रकरणे प्रलंबित असून त्याची वसूली करण्याची कार्यवाही चालू आहे.

तसेच रोहयो निधीच्या ८ प्रकरणापैकी सर्व प्रकरणाची चौकशी झाली असून सर्व रक्कम रु. ३७,६६२/- वसूल करण्यात आली आहे.

(३) अभिलेखे प्रभारात नसणे, ग्रामसेवक मयत असणे इ. कारणामुळे विलंब झालेला आहे.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांना १५ दिवसांत मजुरी प्रदान करण्याबाबत**

**(१५) ४६४१० (२९-०४-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांना १५ दिवसांत मजुरी प्रदान करणे बंधनकारक असल्यामुळे शासनाला विलंब आकारापोटी सन २०१४-२०१५ या वर्षात ७ कोटी २६ लाख रुपये आणि चालु वर्षातील नोव्हेंबर २०१५ पर्यंत २ कोटी ३८ लाख रुपयांचे नुकसान भरपाई म्हणुन शासनाला भुर्दंड सोसावा लागल्याचे माहे डिसेंबर, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर योजने अंतर्गत मजुरांना १५ दिवसाच्या आत मजुरी प्रदान करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२७-१२-२०१६) :**(१) होय.

(२) नाही. तथापि, विहित कालावधीत मजूरीचे प्रदान करण्याच्या सूचना शासनाने क्षेत्रीय स्तरावर दिलेल्या आहेत तसेच, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरीचे प्रदान १५ दिवसांच्या आत करण्यात आले नाही तर मजुरीच्या प्रदानामध्ये होणाऱ्या विलंबासाठी १६ व्या दिवसापासून प्रतिदिवस देय मजूरीवर ०.०५% नुकसानभरपाई देण्यासंदर्भात दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर कार्यपध्दती नवीन असल्याने दि. ३० जून, २०१५ पर्यंत विलंब नुकसानभरपाईच्या रकमेचा भार राज्य शासनामार्फत सोसण्यात आला आहे. विलंब नुकसानभरपाईची रक्कम दि. १ जुलै, २०१५ पासून विलंबास जबाबदार संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून वसुल करण्यात येत आहे.

(३) मजूरी प्रदानास होणारा विलंब टाळण्यासाठी कंत्राटी तांत्रिक कर्मचारी वृंदाची भरती, एक काम दोन मोजमाप पुस्तिका पध्दत, कंत्राटी कर्मचाऱ्यांमार्फत मोजमाप पध्दत व e-FMS या कार्यप्रणालीची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बाभुळगांव (जि.यवतमाळ) येथील बेबंळा प्रकल्पा जवळ प्रस्तावित पर्यटन केद्राचे काम सुरू न झाल्याबाबत**

**(१६) ४७४१८ (२०-०५-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगांव (जि.यवतमाळ) येथील बेंबळा प्रकल्पा जवळ पर्यटन केंद्र प्रस्तावित असुन सदर कामावर निधी उपलब्ध असुनही सार्वजनिक बांधकाम विभाग यवतमाळ यांच्या मार्फत

कुठल्याही प्रकारची निविदा प्रक्रिया केली नसल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निविदेची कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे तसेच निधी उपलब्ध असतांना निविदेची कार्यवाही न करणा-या अधिका-यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१५-१२-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) बाभुळगांव (जि.यवतमाळ) येथील बेंबळा प्रकल्पाजवळ पर्यटन केंद्र विकसीत करणे या कामासाठी पर्यटन विभागाने रु.३५५.५६ लक्षच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन रु.८५.०० लक्ष एवढा निधी वितरीत केलेला आहे. सदर कामासाठी बरेच दिवस जागा उपलब्ध नव्हती. ती बेंबळा प्रकल्प उपविभाग क्र.२ थाळेगाव यांनी उपविभागीय अधिकारी, यवतमाळ यांना दि.१४/८/२०१५ रोजी लिजवर ३० वर्षासाठी हस्तांतरीत केली. तदनंतर सदर जागेची मोजणी शिट व सिमांकन हे दाखविण्यात आले. सदर कामासाठी उपलब्ध जागेचे सविस्तर सर्व्हेक्षण करुन पर्यटन स्थळ म्हणून विकसीत करणेसाठी खाजगी आर्कीटेक्टकडून सविस्तर नकाशे व अंदाजपत्रक तयार करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. उपलब्ध निधीत करावयाचे काम प्राधान्य क्रमाने करण्यासाठी त्याबाबत सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे.

---

**मौजा खिंडसी (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील जलाशयाचे पाणी रामटेक खिंडसी ते जांब बेटेखारी लाभक्षेत्रात सोडण्याच्या मागणीबाबत**

**(१७) ४७५४२ (०३-०५-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा खिंडसी (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील जलाशयाचे पाणी रामटेक खिंडसी ते जांब बेटेखारी लाभक्षेत्रात सोडण्याची मागणी दिनांक १४ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०१-२०१७) :**(१) होय.
(२) खिंडशी पुरक कालव्याद्वारे पेंच प्रकल्पातील अतिरिक्त पाणी खिंडसी तलावात सोडून अधिक पाणीसाठा निर्माण करण्यात येणार आहे. या अतिरिक्त पाणीसाठ्यापासून खिंडसी उच्च पातळी कालव्याद्वारे २४९३ हे. लाभक्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सद्यस्थितीत खिंडसी पुरक कलव्याचे बांधकाम ७० टक्के पूर्ण झाले असून उपलब्ध निधीनुसार उर्वरित काम सुरु आहे.

खिंडसी तलावातून खिंडसी उच्च पातळी कालवा काढण्याचे नियोजीत असून सदर कालव्याचा संरेखा प्रस्ताव क्षेत्रीय स्तरावर तयार करण्यात आला असून मंजूरीबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हापरिषदेमध्ये जिल्हापरिषद सदस्यांना वाटप करण्यात**
**आलेला विकास निधीचा झालेला गैरवापर**

**(१८) ४८११५ (२५-०४-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २००९ पासून जिल्हापरिषदेमध्ये जिल्हापरिषद सदस्यांना वाटप करण्यात आलेला विकास निधीस शासनाची मंजूरी नसतांनाही वाटप करण्यात आल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाची मंजूरी नसलेल्या निधीचा वापर कश्याप्रकारे करण्यात आला आहे वा येत आहे,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तदनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
तथापि, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी स्वउत्पन्नाच्या अंदाजपत्रकामध्ये जिल्हा परिषदेच्या मान्यतेने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत अधिनियम, १९६१ मधील कलम १०० (३) अनुसूचीमधील तरतूदीनुसार १ अध्यक्ष या लेखाशिर्षाखाली जिल्हा परिषद विकास निधी असे लेखाशिर्ष व तरतूद मंजरू करुन जिल्हा परिषद सदस्यांनी सुचविलेल्या विकास कामासाठी नियामानुसार खर्च केला आहे.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्त्यांच्या कामांबाबत**

**(१९) ६०४६५ (२६-०८-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना राबविण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या योजनेमध्ये पहिल्या टप्प्यात किती किलोमिटर लांबीच्या रस्त्यांची कामे करण्यात येणार आहेत,
(३) असल्यास,या कामासाठी किती खर्च येणार आहे व योजनेचे काम केंव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) पहिल्या टप्प्यात २०२२ किमी लांबीच्या रस्त्यांची कामे करण्यात येणार आहेत.

(३) सन २०१५-१६ या वर्षात २०२२ किमी रस्त्यांच्या रु.१११३.०० कोटी अंदाजीत रक्कमेच्या कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे. या रस्त्यांच्या निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली असून बहुतांश कामांना सुरुवात झालेली आहे.

---

### सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेने निविदा न मागविता शेती विषयक औजारे खरेदी केल्याबाबत

**(२०) ६०६०६ (०१-०९-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हा परिषद कृषी विभागातंर्गत सन २००९ ते २०१५ या कालावधीत सदर जिल्हा परिषद कृषी विभागातंर्गत निविदा प्रक्रिया न करता सुमारे ५ कोटीची कृषी अवजारे खरेदी करण्याच्या गैरव्यवहाराप्रकरणी कोकण उपायुक्त व रत्नागिरी कृषी अधिकारी यांच्या शासनाने नेमलेल्या चौकशी समितीने चौकशी पूर्ण केली आहे काय,

(२) असल्यास, सदर खरेदी करताना जिल्हा परिषद कृषी समीतीच्या ठरावामध्ये एकाच कंपनीला सदर अवजारे खरेदी विक्रीचे कॉन्ट्रक्ट मिळावे असा ठराव करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत समितीने याबाबतचा अहवाल सादर केला आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालातील निष्कर्षानुसार दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-१२-२०१६) :**(१) होय, चौकशी पूर्ण झाली आहे.

(२) नाही.

(३) होय.

(४) व (५) सिंधुदुर्ग जिल्हा परिषदच्या कृषी विभागाकडून खरेदी करण्यात आलेली शेती विषयक अवजारे ही विविध नामांकित कंपनीची असून कृषी समिती / जिल्हा परिषदेच्या मान्यतेने खरेदी करण्यात आलेली आहेत. सदर अवजारे / उपकरणे वाजवी दराने खरेदी करण्यात आली असून, तांत्रिक दृष्ट्या चांगल्या दर्जाची आहेत. यामध्ये शासनाचे नुकसान झालेले नाही. त्यामुळे दोषीवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

### नायगांव (जि.नांदेड) तालुक्यातील कुंटूर-बरबडा परिसरात जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेली विविध रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(२१) ६१०२८ (११-०८-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगांव (जि.नांदेड) तालुक्यातील कुंटूर-बरबडा परिसरात जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेली विविध रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाली असून रुपये ८ लाख खर्चाच्या रस्त्याची एका महिन्यातच दुरवस्था झाली असल्याचे दिनांक ३१ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार सदरील कामे निकृष्ट दर्जाची करणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) हे, खरे नाही.
(२) ते (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील वेण्णा धरणातील गाळ काढण्याबाबत**

**(२२) ६१०५१ (२३-०८-२०१६). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रीन थंब संस्थेच्या महात्मा ज्योतीबा फुले पाणी चळवळ पुनरुज्जीवन अभियानांतर्गत पुणे, सोलापूर, जिल्हातील उजनी हिपरगी आणि नागपूर जिल्हयातील वेण्णा धरणातील गाळ काढण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केव्हा होणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-१२-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
एकरुख प्रकल्पाबाबत प्रस्ताव अप्राप्त आहे.
सोलापूर जिल्हयातील उजनी, धरणातील गाळ काढणेसंदर्भातील ग्रीन थंब संस्थेशी क्षेत्रिय स्तरावर प्राथमिक चर्चा झाली आहे.
वेण्णा धरणातील गाळ काढणेसंदर्भात ग्रीन थंब संस्थेचा प्रस्ताव क्षेत्रिय स्तरावर प्राप्त झाला आहे.
(२) ग्रीनथंब संस्थेकडून वेण्णा धरणातील गाळ काढण्याच्या प्रस्तावास क्षेत्रिय स्तरावर मान्यता दिली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्याला उजनी धरणातून २५ टीएमसी पाणी देण्याबाबत**

**(२३) ६१०५७ (२३-०८-२०१६). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा-भीमा स्थितीकरण योजनेमधून मराठवाड्याला उजनी धरणातून २५ टीएमसी पाणी देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप काय आहे तसेच उजनी धरणातील पाणी वाटपाची मर्यादाही संपलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जललवादा यांनी कृष्णा नदीतील पाणी भीमा नदीत देण्यास स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मराठवाड्याला २५ टीएमसी पाणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१२-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

कृष्णा-भिमा स्थिरीकरण प्रकल्पाद्वारे उजनी जलाशयात सोडण्यात येणाऱ्या पाण्यापैकी कृष्णा-मराठवाडा प्रकल्पासाठी २१ अ.घ.फू. पाणी तथा सीना कोळेगाव प्रकल्पाच्या खालील मुक्त पाणलोट क्षेत्रातुन २.६६ अघफु पाणी असे एकूण २३.६६ अ.घ.फु. पाणी दि.०७/०७/२००९ च्या शासन पत्रान्वये कृष्णा खोऱ्याच्या मराठवाड्यातील भागास द्यावयाच्या पाणी वापराच्या सुधारीत जल नियोजनास मान्यता प्राप्त आहे. तथापि प्रथम टप्प्यात ७ अ.घ.फु. मर्यादेत कामे हाती घेण्याचे निर्देश आहेत.

(२) या प्रकल्पा अंतर्गत उस्मानाबाद जिल्ह्यासाठी उपसा सिंचन योजना क्र. १ व २ तसेच बीड जिल्ह्यासाठी उपसा सिंचन योजना क्र.३ चे नियोजन आहे.

उजनी धरणातील पाणी वाटपाशी या योजनेचा संबंध नाही.

कृष्णा पाणी तंटा लवाद १ कलम १४ ब नुसार आंध्र प्रदेशातील पोलावरम प्रकल्पाचे अनुषंगाने महाराष्ट्रास अनुज्ञेय ठरलेल्या ७ अ.घ.फु. पाणी वापरावर सदर योजनेचा टप्पा १ आधारित आहे.

(३) दुसऱ्या कृष्णा पाणी तंटा लवादाने आंतर उपखोरे वापरास मनाई केलेली आहे. मात्र या लवादाचे निर्णय अद्यापी अंमलबजावणीसाठी अधिसुचित झालेला नाही.

(४) दि.०७/०७/२००९ च्या शासन पत्रान्वये कृष्णा खोऱ्याच्या मराठवाड्यातील भागास द्यावयाच्या २३.६६ अघफु पाणी वापराच्या सुधारीत जल नियोजनास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेवर आधारीत कृष्णा मराठवाडा प्रकल्पाच्या रु.४८४५.०५ कोटी रक्कमेच्या सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालास दि.२७/०८/२००९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

योजनेच्या पहिल्या टप्प्याचे काम पुढील ४ वर्षात पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन आहे. यासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा या उद्देशाने या योजनेस लागणारा निधी मा.राज्यपाल महोदयांचे निधी वाटपाचे सुत्राबाहेर ठेवण्याची विनंती मा.राज्यपाल महोदयांना करण्याचा निर्णय मा.मंत्रीमंडळाने घेतला आहे.

कृष्णा पाणी तंटा लवाद-२ चा निर्णय अधिसूचित झालेनंतर त्यातील तरतूदी अभ्यासून टप्पा-२ ची कामे हाती घेण्यात येतील.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विखळे (ता.खटाव, जि.सातारा) येथे रोजगार हमी योजनेची कामे सुरु करुन मजूरांना रोजगार देण्याबाबत**

**(२४) ६१३७९ (१८-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विखळे (ता.खटाव, जि.सातारा) येथे रोजगार हमी योजनेच्या कामाची मागणी असतानाही गेल्या दीड महिन्यापासून संबंधित अधिका-यांनी मंजूरी न दिल्याने येथील ७० मजूरांवर रोजगारा अभावी उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे मे,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्‌नुसार मजूरांना रोहयोची कामे सुरु करुन मजूरांना रोजगार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०९-१२-२०१६) :**(१) नाही, अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे बिसुर (ता.मिरज, जि.सांगली) येथील कर्नाळ कावजी खोतवाडी रस्त्यावर शेतकऱ्यांनी अतिक्रमण केल्याबाबत**

**(२५) ६१५५९ (२६-०८-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बिसुर (ता. मिरज, जि. सांगली) येथील गट क्रमांक ८२६, ८२७ अ, ब/३ येथे कर्नाळ कावजी खोतवाडी रस्त्यावर शेतकऱ्यांनी अतिक्रमण करुन रस्ता बंद केल्याची बाब माहे मे २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील रस्त्यावरती अतिक्रमण केल्यामुळे शासनाने या रस्त्यावरती २५ लक्ष रुपये खर्च करुन बांधलेला पूल विनावापर पडून आहे तसेच हा रस्ता बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांना दुसरा कोणताही पर्यायी रस्ता नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक शेतकऱ्यांनी अनेक वेळा मोर्चे, आंदोलन, आमरण उपोषण करुन देखील याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(५) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्या शेतकऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) शेतकऱ्यांनी अतिक्रमण करुन रस्ता बंद केला असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २००८ साली पुल बांधलेला आहे. परंतु त्या पुला पुढील २०० मीटर लांबीतील शेतकऱ्यांनी दिवाणी न्यायालयात व तहसिल यांच्या न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. मा.दिवाणी न्यायालयाने "जैसे थे" स्थिती ठेवण्यात आदेशार्थ केले आहे. परंतु प्रश्नांकित लांबीत २.५० मी. रुंदीचा रस्ता उपलब्ध आहे. या रस्त्यांवरुन बैलगाडी, ट्रॅक्टर, दुचाकी वाहने यांची ये-जा होत आहे. त्यामुळे पुल विनावापर पडून आहे अशी बाब नाही.
(३) याबाबत सरपंच, कर्नाळ व ग्रामस्थ कर्नाळ यांनी जिल्हाधिकारी यांना सन २०१३ मध्ये निवेदने दिलेली आहेत. परंतु सन २०११ मधील दिवाणी दाव्याचा निकाल प्रलंबित असल्याने कार्यवाही झालेली नाही.
(४), (५) व (६) दिवाणी दाव्याचा निकाल प्रलंबित असल्याने चौकशी करण्याचा व संबंधीत शेतकऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हा परिषदेतील अखर्चित निधीबाबत**

**(२६) ६२०१४ (२९-०८-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हा परिषदेला विकासाच्या नावावर मोठ्या प्रमाणावर निधी प्राप्त होतो परंतु प्राप्त निधीतून दरवर्षी मोठ्या प्रमाणावर निधी अखर्चित राहतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्मचारी, अधिकारी व कंत्राटदार संगनमताने निधीमध्ये गैरव्यवहार करण्याच्या हेतूने निधीचे समायोजन करीत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार निधी अखर्चित ठेऊन गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१२-२०१६) :**(१) हे खरे आहे.
विविध योजनांचा निधी ज्या आर्थिक वर्षी प्राप्त झाला त्या आर्थिक वर्षात तसेच पुढील वर्षात खर्च करण्याची मान्यता शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक ६ जून २००८ नुसार आहे.
(२) हे खरे नाही.

जिल्हा परिषदेला प्राप्त होणारा निधी त्या आर्थिक वर्षात खर्च झाला नाही तर असा निधी शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक ६ जून, २००८ नुसार पुढील वित्तीय वर्षात खर्च करण्याची अनुमती आहे. त्यानुसार सन २०१६-१७ मधील निधी मार्च २०१७ पर्यंत नियोजनानुसार खर्च करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील वैंनगंगा नदीवर असलेला सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत**

**(२७) ६२०२० (२९-०८-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात चीचडोह, वाघोली उपसा सिंचन, मुल्लूर, कोटगल, कळगाव, येनबांधला ई ब्यारेज हे सिंचन प्रकल्प वैनगंगा नदीवर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे जिल्ह्यातील असंख्य शेतकरी व ऊद्योगांना सिंचनाची सोय उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सिंचन प्रकल्प पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-११-२०१६) :**(१) होय.

(२) होय, प्रस्तावित बॅरेज व त्यावरील आश्वासित उपसा सिंचन योजनेद्वारे चंद्रपूर जिल्ह्यातील २८६८० हेक्टर व गडचिरोली जिल्ह्यातील २५७०९ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येणार आहे. तसेच उद्योगांना पाणी पुरवठा करण्याकरीता बॅरेजचे साठा नियोजनात तरतूद करण्यात आली आहे.

(३) वाघोली उसियो चे बांधकाम पूर्ण झाले आहे. चिचडोह बॅरेजचे बांधकाम सुरु असुन ७५% काम पूर्ण झाले आहे. चिचडोह बॅरेज करिता सन २०१६-१७ मध्ये रु.४१.५० कोटी निधी उपलब्ध असून सन २०१८ मध्ये प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. कोटगल बॅरेजला प्रशासकीय मान्यता प्राप्त असून यास पर्यावरण मान्यता प्राप्त नाही. निधी प्राप्त झाल्यावर प्रथम वैधानिक मान्यता घेऊन बांधकाम सुरु करण्यात येईल. कळमगांव बॅरेजचे अहवाल मंजुरीचे प्रक्रियेत आहेत. तसेच मुल्लूर बॅरेज अभ्यासाधीन आहे. येन बोथाल बॅरेजची आवश्यकता नाही. कारण तेलंगणा शासनाकडून प्रस्तावित असलेल्या तुमडीहेटी बॅरेजचे पाणी पसाऱ्यातून मूनबोथला बॅरेजवरुन प्रस्तावित असलेल्या उपसा सिंचन योजना घेता येऊ शकतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयातील सुर्या प्रकल्पाच्या कालव्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२८) ६२२४७ (१८-०८-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील सूर्या प्रकल्पाच्या उजव्या व डाव्या कालव्यातून हजारो लिटर पाण्याची गळती होत असल्याचे माहे मे, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कालव्याची पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार सदर कालव्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने काणेती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१२-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

सूर्या प्रकल्पाची कालव्यांची बांधकामे व अस्तरीकरण सुमारे ३०-३५ वर्षे जुने असल्याने बांधकामे तसेच अस्तरीकरण क्षतिग्रस्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामस्वरुप कालव्याच्या बांधकामातून काही प्रमाणात गळती होत असते.

(२) व (३) क्षेत्रीय स्तरावर कालव्याची नियमित पहाणी करण्यात येते व पाणी सोडण्यापूर्वी क्षेत्रिय स्तरावर कालव्याची निधीच्या उपलब्धतेनुसार अत्यावश्यक कामाची दुरुस्ती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आष्टी (जि.बीड) तालुक्यातील खुंटेफळ प्रकल्प क्र.३ निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(२९) ६२२८० (२३-०८-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निधीअभावी प्रलंबित असलेले राज्यातील प्रकल्प निधी देऊन पूर्ण केले जातील व सिचंन क्षमतेत वाढ करण्याचे जलसंपदा खात्याचे उद्दीष्ट पूर्ण करण्याचे आश्वासन जलसंपदा मंत्र्यांनी माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आष्टी (जि.बीड) तालुक्यातील खुंटेफळ प्रकल्प क्र.३ निधी अभावी प्रलंबित असून तो पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, किती कालावधीत या प्रकल्पाला निधी उपलब्ध होऊन काम सुरु होणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०७-१२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) खुंटेफळ प्रकल्प, ता. आष्टी, जि.बीड या प्रकल्पास सन २०१६-१७ या वर्षात ०.००१० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देणेत आला आहे.

(३) राज्याच्या अर्थोपायाची स्थिती व प्रकल्पाचे प्राधान्य यानुसार प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

---

**मुर्तिजापुर (जि.अकोला) तालुक्यातील ब्रम्ही ते बोर्टा गावातील रस्त्यांवर म.गा.रा.ग्रा.रो.ह. योजनेअंतर्गत लावण्यात आलेल्या झाडांच्या देखभालीकडे दुर्लक्ष करीत असल्याबाबत**

**(३०) ६२२९८ (११-०८-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तिजापुर (जि.अकोला) तालुक्यातील ब्रम्ही ते बोर्टा गावातील रस्त्यांवर म.गा.रा.ग्रा.रो.ह. योजनेअंतर्गत झाडे लावण्याचा प्रस्ताव मंजूर होऊन सन २०१३ मध्ये झाडे लावण्यात येऊन ती जगविण्यासाठी शासनाने २० लाख ५० हजार रुपये खर्च केला परंतू सदर लावण्यात आलेल्या झाडाची देखभाल न करता त्या झाडांना आग लावून जाळण्यात आल्याची घटना दिनांक १२ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लावण्यात आलेल्या झाडांची देखभाल न करता त्यांना आग लावून जाळण्याचे कारण काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार आग लावून वनाचे नुकसान करणाऱ्यांवर व झाडाच्या देखभालीकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१२-२०१६) :**(१) नाही.

ब्रम्ही ते बोर्टा गावातील रस्त्यांवर दिनांक २१/३/२०१३ रोजी वृक्ष लागवड करण्यात आली. देखभाल व संगोपनासह दिनांक ३/३/२०१६ रोजी काम पूर्ण झाले. या कामावर कुशल व अकुशल असा एकूण १४.०२ लाख खर्च झालेला आहे. लागवड अधिकारी, मुर्तिजापूर यांनी दि.३१.३.२०१६ रोजीच्या पंचनाम्यानुसार १६०० वृक्षांचे हस्तांतरण उपविभागीय अधिकारी, सा.बां. उप विभाग, मुर्तिजापूर यांच्याकडे करण्यात आले.

मंडळ अधिकारी (महसूल), माना यांच्या पंचनाम्यानुसार जिवंत झाडांची संख्या ११०५ आहे.

मंडळ अधिकारी (महसूल), माना यांचा पंचनामा व ठाणेदार, माना यांचा अहवाल या वरुन वृक्षांना आग लावल्याबाबतची घटना दि.१२ मे, २०१६ रोजी किंवा त्या सुमारास घडली नसल्याचे निदर्शनास येते.

(२), (३) (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिंदखेडा (जि.धुळे) तालुक्यातील गेल्या अनेक वर्षापासून बंद पडलेल्या आठ योजनांसह २२ उपसा सिंचन योजनांच्या दुरुस्तीबाबत**

**(३१) ६२३२६ (१८-०८-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंदखेडा (जि.धुळे) तालुक्यातील गेल्या अनेक वर्षापासून बंद पडलेल्या आठ योजनांसह अन्य २२ उपसा सिंचन योजनांच्या दुरुस्तीसाठी मा.राज्यमंत्र्यांनी माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवर्षण प्रवण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिंदखेडा तालुक्यातील २६ गावांना त्याचा लाभ होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या उपसासिंचन योजना कोणकोणत्या आहेत व त्या पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे,
(४) असल्यास, सदर उपसासिंचन योजना दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-११-२०१६) :**(१) मा.मंत्रिमंडळ व मा.राज्यपाल ह्यांच्या मान्यतेने दि.०६.०६.२०१६ च्या शासन निर्णयाद्वारे धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील एकूण २२ उपसा सिंचन योजनांच्या विशेष दुरुस्ती कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे.
(२) होय.
(३) सौ.कमलताई पी पाटील उसिंयो, विरदेल, श्री.विंदयासिंनी उसिंयो, धमाणे, श्री.आशापुरी तापामाई उसिंयो, पाटण, श्री.जयभवान उसिंयो, निमगुळ, श्री.रवीकन्या उसिंयो, लोहगांव, श्री.भाग्यलक्ष्मी उसिंयो, लंघाणे, श्री.दाऊळ मंदाणे उसिंयो, मंदाणे व श्री.अककडसे उसिंयो, नेवाडे या धुळे जिल्ह्यातील ८ उपसा सिंचन योजनांच्या विशेष दुरुस्तीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. राज्याच्या अर्थसंकल्पातून निधी उपलब्धतेनंतर २ वर्षात कामे पूर्ण होऊ शकतील.
(४) शासनाने धुळे व नंदुबार जिल्ह्यातील २२ सहकारी उपसा सिंचन योजनांच्या दुरुस्तीच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहें. त्यानुषंगाने क्षेत्रिय स्तरावर पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**निम्न पेढी प्रकल्प (ता.भातकुली, जि.अमरावती) भुसंपादन व पुर्नवसन करण्याबाबत**

**(३२) ६२४८० (२९-०८-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निम्न पेढी प्रकल्प (ता.भातकुली, जि.अमरावती) चे कामाकरीता भुसंपादन व पुर्नवसन करीता माहे मार्च, २०१७ पर्यंत २२५ कोटी रु. ची आवश्यकता असून सन २०१६-१७ चा उपलब्ध निधी १०३.७६ कोटी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर निधी केव्हा उपलब्ध करुन देण्यात येईल,
(३) असल्यास,प्रकल्पाचे कामे गरजेप्रमाणे पूर्ण करण्यास सन मार्च २०१७ पर्यंत आवश्यक असलेला निधी १२१.२४ कोटी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-१२-२०१६) :**(१) नाही.

या प्रकल्पाच्या भूसंपादन व पुनर्वसनाकरीता रु. २०६ कोटी एवढ्या निधीची आवश्यकता आहे. त्यापैकी सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये एकूण रु. १३८.३६ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे. या प्रकल्पास सन २०१६-१७ मध्ये रु. १५०.०० कोटी अर्थसंकल्पीय तरतूद असून त्यापैकी रु. १२०.०० कोटी निधी वितरित करण्यात आला आहे व तो भूसंपदानासाठी वर्ग करण्यात आला आहे. प्रलंबित मागणी रु.६७.८३ कोटी एवढी आहे.

(२) व (३) सन २०१६-१७ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदी पैकी उर्वरीत रु. ३० कोटी निधी या वर्षी प्रकल्पास उपलब्ध करुन देणेचे प्रस्तावित आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**पंतप्रधान आवास (ग्राम) योजनेसाठी लाभार्थी निवडीच्या याद्या तयार करण्याबाबत**

**(३३) ६२४९९ (१८-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान आवास (ग्राम) योजना यासाठीचे लाभार्थी आता सन २०११ च्या सर्वेक्षणानुसारच निवडण्याचे ठरविले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठीच्या लाभार्थी निवडीच्या याद्या तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) होय.

(२) केंद्र शासनाने दि. १३ एप्रिल, २०१६ च्या पत्रान्वये सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ च्या माहितीचा वापर करुन प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने, राज्य शासनाने दि. ०१ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ च्या माहितीचा वापर करुन प्राधान्य क्रम याद्या तयार करणेच्या सविस्तर सूचना निर्गमित केल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भामा आसखेड (जि.पुणे) धरण क्षेत्रात साखळी पद्धतीने सिमेंट बंधारे बांधण्याबाबत**

**(३४) ६२७९५ (२९-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा आसखेड (जि.पुणे) धरणातील पाणी नदीत सोडल्याने बुडीत क्षेत्रातील गावांना पिण्याकरिता व शेतीकरिता पाण्याची टंचाई निर्माण होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुडीत क्षेत्रातील गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होत असल्याने धरण क्षेत्रात साखळी पद्धतीने सिमेंट बंधारे बांधणेकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंधारण राज्यमंत्री यांस माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने साखळी पद्धतीने सिमेंट बंधारे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१२-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) याबाबत शासनस्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने रस्त्याच्या कामाचा अहवाल अभियंत्याने सादर करण्यापूर्वीच कंत्राटदाराला धनादेश दिल्याबाबत

**(३५) ६२८३८ (२०-०८-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने ८ लाखांच्या रस्त्याच्या कामाचा अहवाल अभियंत्याने सादर करण्यापूर्वीच परस्पर कंत्राटदाराला धनादेश दिल्याची बाब माहे जून, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) जिल्हा परिषद वित्त विभागातून कोणतेही देयके मंजूर करुन घेण्यासाठी टक्केवारी द्यावी लागते मात्र त्या टक्केवारीसाठी अधिकाऱ्यांकडून नियम डावलले जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार अहवाल सादर करण्यापूर्वीच कंत्राटदाराला धनादेश देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) हे खरे नाही. संबंधीत शाखा अभियंता व उपविभागीय अभियंता यांनी प्रत्यक्ष १०० % कामाची पाहणी करुन मोजमाप नोंदवहीमध्ये मोजमापे नोंदविली आहेत. त्यानंतर देयके कार्यकारी अभियंता यांच्याकडे पारित करण्यासाठी सादर

करण्यात आली होती. सदर देयकांची तांत्रिक व गणितीय तपासणी करण्याकरिता वित्त विभागाकडे सादर करण्यात आली होती. वित्त विभागाने सदर देयकांची गणितीय तपासणी करुन व पुरक कागदपत्रांची पडताळणी करुनच सदर देयकांचे धनादेश कंत्राटदारांना अदा करणेकरीता बांधकाम विभागाकडे सुपुर्द केलेले आहेत. वित्त विभागाकडून कंत्राटदारांना परस्पर धनादेश अदा करण्यात येत नाही. तसेच बांधकाम विभागाकडून देयक वित्त विभागाला प्राप्त झाल्याशिवाय कंत्राटदाराचे नावे धनादेश देता येत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) ते (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हा परिषदेच्या बिंदू नामावलीमध्ये झालेला गैरप्रकार**

**(३६) ६२९२२ (२०-०८-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेच्या बिंदू नामावलीमध्ये गैरप्रकार झाल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जिल्हा परिषदेला आदिवासी विकास समितीने भेट दिली तेव्हांही बिंदू नामावली सुधारण्याचे आदेश दिले परंतु त्या आदेशाचे पालन झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बिंदू नामावली सुधारण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) नाही. गैरप्रकार झाल्याची बाब आढळून आली नाही.

(२) नाही. पंचायत विभागाची बिंदूनामावली सुधारीत करुन मागासवर्ग कक्षाची मान्यता घेण्यात आली आहे.

(३) सन १९९७-९८ पासून सुधारित बिंदूनामावली तयार करणे बाबाबत दिलेल्या निर्देशानुसार साप्रवि, लघुसिंचन, कृषी, अर्थ व शिक्षण या विभांगाचा सुधारित प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) सन १९९६-९७ पासून २० वर्षाची सुधारित बिंदूनामावली तयार करावयाची असल्याने सेवा जेष्ठता, पदोन्नत्या नस्त्या, बिंदु पंज्या, नियुक्ती आदेश, पदोन्नती आदेश इ. दस्तऐवजाची पडताळणी करुन सुधारित प्रस्ताव तयार करावयाचा असल्याने या कामास काही कालावधी लागणार आहे.

---

**बुलढाणा जिल्हयातील नायगाव खु. ते नायगांव बु. रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३७) ६३०९५ (१८-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्रीसडक योजनेतंर्गत लहाळा फाटा (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथून नायगाव खु पर्यंत रस्त्याचे काम पूर्ण झाले असून नायगाव खु ते नायगाव बु १ कि.मी रस्त्याचे काम पूर्ण न झाल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नायगाव खु ते नायगाव बु किमी रस्ता पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) नाही.

लव्हाळा फाटा (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथून नायगाव खु. पर्यंत रस्त्याचे काम प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेत समाविष्ट नसल्याने प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत करण्यात आलेली नाही.

राज्य मार्ग-१७३ पासून नायगांव बु. ते नायगांव खु. पर्यंत रस्ता लांबी ५.४० कि.मी. दर्जा सुधारणेचे कम टप्पा क्र. ५ (सन २००५-०६) पॅकेज क्र. MH-०७१५ नुसार दि.३१.०८.२००८ रोजी पूर्ण करण्यात आले. कामाचा दोष दायीत्व कालावधी दि.३०.०८.२०१३ रोजी समाप्त झाला आहे.

तद्नंतर विशेष दुरुस्ती कार्यक्रम सन २०१४-१५ अंतर्गत सा.क्र. १/०० ते ३/०० या २.०० कि.मी. लांबीचे डांबरी नुतनीकरणाचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत रस्ता सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे चांधई (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथे गावांना जोडणारे रस्ते नसल्याबाबत**

**(३८) ६३१०२ (१८-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे चांधई (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील गोद्रीवाडी गावाला गेल्या दहा-पंधरा वर्षापासून गाव जोडणारा रस्ता नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावांना जोडणारा रस्ता करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) हे खरे नाही. गोद्रावाडी वसाहत ही चांधई गावापासून २.०० कि.मी अंतरावर इतर जिल्हा मार्ग क्र.१२६ वर असून सदर रस्ता सुस्थितीत आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चिखली (जि.बुलढाणा) पंचायत समितीला अनुदानाची रक्कम देण्याबाबत

**(३९) ६३११४ (२०-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) पंचायत समितीला सन २०१२ ते २०१५ अखेर पर्यंत वाढीव उपकरापोटी कोट्यवधी रुपयांची रक्कम अद्याप पंचायत समितीला प्राप्त झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अनुदानाची रक्कम त्वरीत पंचायत समितीला अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-१२-२०१६) :**(१) होय, अंशत: खरे आहे.

पंचायत समिती चिखली (जि.बुलढाणा) यांना सन २०१२ ते २०१५ या कालावधीत देय रक्कम रु. २५,९२,१०२/- इतकी होती. त्यापैकी रु. ५,७५,६४४/- इतकी रक्कम वितरीत केली असून रु. ५,४६,०५८/- इतकी रक्कम वितरीत करण्यात येत आहे.

(२) सन २०१२ ते २०१५ या कालावधीत मागणी केलेल्या रक्कमेपेक्षा कमी अनुदान मंजूर झाल्याने उर्वरित रक्कम रु. १४,७०,४००/- ची मागणी करण्यात येऊन सदर अनुदान प्राप्त होताच पंचायत समिती चिखलीला वितरीत करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील अनेक रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(४०) ६३१२६ (१८-०८-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामीण भागातून तालुक्याला जोडणारे रस्त्यांची व ग्रामीण भागातील अनेक रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक रस्त्यांची १५ ते २० वर्षापासून दुरुस्ती न केल्याने नागरीकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत तेथील नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, अलिबाग (जि.रायगड) यांच्याकडे वांरवार निवेदने तसेच तक्रारी करुन सुध्दा कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही. सदर तालुका अतिशय डोंगराळ व सह्याद्रीच्या पायथ्याशी असल्याने पर्जन्यमान जास्त प्रमाणात आहे. रस्त्यांच्या एकूण लांबीच्या मानाने दुरुस्तीसाठी निधी अत्यल्प प्राप्त होतो. प्राप्त निधीमधून आवश्यकतेनुसार कामे वेळोवेळी हाती घेवून पूर्ण करण्यात आलेली आहेत.

(३) ते (६) रस्त्यांच्या रु.५६.५० कोटी रक्कमेचा दुरुस्तीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडील दिनांक २४.२.२०१६ च्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधीकरणाकडे सादर करण्यात आला आहे. मंजूरी व निधी उपलब्धतेनुसार दुरुस्तीची कामे जिल्हा परिषदेमार्फत हाती घेण्यात येतील.

---

### आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यांतील कृष्णा व गोदावरी खोऱ्यांतील सुमारे २१ साठवण तलावांच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत

**(४१) ६३२२८ (२९-०८-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यांतील कृष्णा व गोदावरी खोऱ्यांतील सुमारे २१ साठवण तलावांचे प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू साठवण तलावांच्या प्रस्तावांस तातडीने मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०५-१२-२०१६) :**(१) नाही.

(२) प्रशासकीय मान्यता प्रस्ताव तयार करणेचे काम क्षेत्रीय यंत्रणा स्तरावर प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दारिद्रय रेषेखालील कुटूंबांची नवीन यादी तयार करण्याबाबत

**(४२) ६३७९५ (२०-०८-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन १९९७ या वर्षी दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची यादी तयार केली आहे मात्र त्या यादीतील कुंटूंबापैकी किती कुंटूंब दारिद्रय रेषेच्या वर आली याची कोणतीही नोंद शासनाकडे नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६ पर्यंत या यादीमध्ये कोणतीही दुरुस्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात असलेली विधवा, परिव्यक्ता, अपंग, अनाथ तसेच इतरही अनेक कुटूंबांना दारिद्रय रेषेखाली असूनही यादीत नाव नसल्याने दारिद्रयरेषेखालील लोकांसाठी असलेल्या योजनांचे लाभ घेता येत नाहीत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दारिद्रय रेषेखालील कुटूंबांची नवीन यादी तातडीने तयार करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-११-२०१६) :**(१), (२), (३) व (४) सन १९९७ मध्ये उत्पन्न व खर्च या निकषांच्या आधारे करण्यात आलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे पात्र दारिद्र्यरेषेखालील कुटूंबांना विविध योजनांचा लाभ सन २००५-०६ पर्यंत देण्यात आलेला आहे. तथापि, दारिद्र्य रेषेखालील कुटूंबे निश्चित करण्याकरिता नव्याने कुटूंब गणना-२००२ करण्यात आली, याअंतर्गत सामाजिक व आर्थिक सर्वेक्षणांआधारे (Score Based Ranking नुसार) दारिद्र्यरेषेखालील कुटूंबांचे सर्वेक्षण करण्यात आले असून सध्या यानुसार पात्र ठरलेलया कुटूंबांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात येतो.

केंद्रीय ग्रामीण मंत्रालयाने, १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या अनुषंगाने समाजातील तळागाळातील घटकांसाठी विशेषत्वाने असलेल्या विकास योजना व कार्यक्रमांचा फायदा त्यांनाच मिळावा यासाठी ग्रामीण व नागरी भागात सामाजिक, आर्थिक व जात निहाय सर्वेक्षण कार्यक्रम-२०११ करण्याचे निश्चित केले होते.

याअंतर्गत प्रत्येक कुटूंबनिहाय सदस्यांची माहिती, रोजगार व उत्पन्नांचे साधन, मत्ता, जमिनीची मालकी इ. बाबतची माहिती सर्वेक्षणांतून गोळा करण्यात आली असून, या माहिती आधारे अंतिम याद्या प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. सदर सर्वेक्षणांतून संकलित करण्यात आलेली माहिती, शासनाच्या विविध योजनांच्या पात्र लाभार्थ्यांच्या निवडीकरिता उपयोगात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोर्शी व वरुड (जि.अमरावती) तालुक्यातील अपुर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत**

**(४३) ६३८९२ (११-०८-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील मोर्शी व वरुड तालुक्यातील अपुर्ण सिंचन प्रकल्प तातडीने पुर्ण करावेत अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार अपुर्ण सिंचन प्रकल्प पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-११-२०१६) :**(१) होय, मा.श्री.अनिल बोंडे, वि.स.स. मोर्शी यांनी दि.१५/०९/२०१५ च्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केलेली आहे.

(२) सदर मागणी मध्ये पंढरी मध्यम, चांदसवाठोडा, पाकनदी, झटामझरी, भिमडी, पवनी, व चारगड असे ७ प्रकल्प पुर्ण करण्याबाबत मागणी केली आहे. त्यापैकी झटांमझरी सन २०१६-१७ मध्ये चांदस वाठोडा, पाकनदी भिमडी व पवनी सन २०१७-१८ मध्ये तसेच पंढरी मध्यम प्रकल्प व निम्नचारगड सन २०१८-१९ मध्ये पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**मांगली ते पैनगंगा (ता.झरी, जि.यवतमाळ) नदीपर्यंत**
**केलेल्या रस्त्याची दुरुवस्था झाल्याबाबत**

**(४४) ६३९७६ (०१-०९-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांगली ते पैनगंगा (ता. झरी, जि.यवतमाळ) नदीपर्यंत केलेल्या रस्त्याच्या निकृष्ट बांधकामुळे रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामाकरीता ७० लाख रुपये खर्च करुन डांबरीकरण करण्यात आले होते परंतु ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे रस्तावर खड्डे पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत व सदर रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) प्रश्नाधिन रस्त्याच्या नवीन बांधकामातील ८ ठिकाणी रस्ता खचल्याचे जुलै २०१६ मध्ये निदर्शनास आले असून या ८ ठिकाणी व्यतिरिक्त उर्वरीत संपूर्ण बांधकाम सुयोग्य स्थितीत आहे.

(२) या बांधकामा करीता एकूण रु.६९.९६ लक्ष खर्च झाला आहे. बांधकाम विनीर्देशानुसार व योग्य दर्जाचे झालेले आहे. तथापि खचलेला भाग ओल्या रेतीच्या वाहतूकीच्या वेळेस रेतीतून/ वाहनातून वाहिलेले पाणी सतत पृष्ठभागावर पडणे, माहे जूनपासून जोमदार पाऊस पडणे, इत्यादी प्रमुख कारणामुळे खचला आहे.

(३) रस्ता खचण्यामागील कारणाची जिल्हा परिषदेकडील उपअभियंता यांनी चौकशी केली असून नवीन रस्त्याच्या भाग सतत ओला असणेच्या कारणामुळे व भार वाहन क्षमतेहून जादा भाराच्या वाहन वाहतूकीमुळे हा भागा खचला असे आढळले आहे.

(४) व (५) सदर रस्त्याचे बांधकाम योग्य दर्जाचे व विनिर्देश झालेले आहे. तथापि खचलेल्या रस्त्याच्या भागाची स्वखर्चाने विनाविलंब दुरुस्ती करुन देण्याचे आदेश कंत्राटदाराला दिले असून त्यानुसार दोष निवारण दुरुस्तीची कार्यवाही प्रगतीत असल्याने ठेकेदाराविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील विविध इतर जिल्हा मार्गांच्या कामांना मंजुरी मिळण्याबाबत

**(४५) ६४४७८ (२९-०८-२०१६). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील टाळसुरे-साखलोळी-गावतळे, चिंचघर-तिसे,वाकवली-टेटवली-शेरवल,पालगड मुख्य रस्ता, सोवेली-भाट्घर-मुंगिज, गोठे बौद्धवाडी ते बोरकत या इतर जिल्हा मार्गांच्या कामांना मंजुरी मिळावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांना पत्राद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दापोली तालुक्यातील सदर रस्ते दुर्गम भागातील असून वाड्या-वस्त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झाली असून नागरीकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्यांचे विनाविलंब खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) दिनांक ३० जून, २०१६ चे पत्र प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. परंतु या रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत विविध लोकप्रतिनिधींकडून मागण्या प्राप्त आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) प्रश्नामध्ये टाळसूरे साखळोली कोहबांद्रे इतर जिल्हा मार्ग क्र.२० जलगाव गावतळे इतर जिल्हा मार्ग क्र.१९, चिंचघर रस्ता ग्रामीण मार्ग क्र.५, संगलट शेरवळ टेटवली इतर जिल्हा मार्ग क्र. ३०, पालगड जोड रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ३०, सोवेली भाटघर मुगीज ग्रामीण मार्ग क्र. ६ व देव्हारे धामणी गोठे बोरखत बौध्दवाडी ग्रामीण मार्ग क्र.९० या एकूण ७ रस्त्यांचा समावेश आहे.

त्यापैकी टाळसूरे साखळोली कोळबांद्रे इतर जिल्हा मार्ग क्र.२० व जलगाव गावतळे इतर जिल्हा मार्ग क्र. १९ या रस्त्यांच्या डांबरी नुतनीकरणाची प्रत्येकी रु.२.२८ लक्षची कामे रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत मंजूर आहेत.

वरील ७ रस्त्यांच्या उर्वरीत खराब लांबीतील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी एकूण रु.१०१०.५२ लक्ष निधीची आवश्यकता आहे.

रस्ते लांबीच्या प्रमाणात विभागास उपलब्ध होणारा निधी अत्यंत अल्प आहे. याउलट शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या मागण्या जास्त आहेत.

जिलहा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषास अधिन राहून सदर कामे टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहील.

---

**डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील वाडा खडकोना ग्रामपंचायत क्षेत्रातील पारधी पाडा गुरव पाडा येथे ६० हून अधिक कुटुंबे मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याबाबत**

**(४६) ६४७३३ (२९-०८-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यतील वाडा खडकोना ग्रामपंचायत क्षेत्रातील पारधी पाडा गुरव पाडा येथे ६० हून अधिक कुटुंबे, रस्ते, पाणी, वीज, आरोग्य आणि शिक्षण या मुलभूत सुविधांपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर आदीवासी पाडयांमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) वाडा खडकोना या ग्रामपंचायतींतर्गत पारधी पाडा येथे ११ व गुरव पाडा येथे ८९ कुटूंबे वास्तव्यास आहेत. या गावासाठी रस्ते, वीज, पाणी, शिक्षण, आरोग्य इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तोंडवली ते बावशी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४७) ६४७४३ (१८-०८-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तोंडवली ते बावशी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली असून या रस्त्याची रुंदी वाढवून खडीकरण व डांबरीकरण करण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी वारंवार शासनाने मागणी केल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याची रुंदी वाढवून खंडीकरण व डांबरीकरण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) अशी मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) व (३) प्रश्नाधीन तोंडवली बावशी रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१८५ असून या रस्त्याची एकूण लांबी ३.२२० कि.मी इतकी आहे. त्यापैकी २.६०० कि.मी लांबी डांबरी पृष्ठभागाची असून ०.६२० कि.मी. पृष्ठभाग मातीचा आहे. सदर रस्त्यावर बारमाही एस.टी. वाहतूक सुरु आहे.

प्रश्नांकित रस्त्यांच्या १.०८५ कि.मी. लांबीतील रस्ता नुतनीकरणाची कामे सन २०१५-१६ अंतर्गत पूर्ण करण्यात आली आहेत. या रस्त्यांच्या दुतर्फा भातशेती व ग्रामस्थांची खाजगी जमीन असलयाने रस्ता रुंदीकरणासाठी जमीन उपलब्ध होणे अडचणीचे असल्याबाबत ग्रामपंचायतीने कळविले आहे.

सदर रस्त्याच्या १.१०० कि.मी. लांबीतील डांबरी नुतनीकरण व ०.६२० कि.मी लांबीतील खडीकरण डांबरीकरण करणे आवश्यक असून जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषास अधिन राहून सदर काम टप्प्या-टप्प्याने करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

---

**राज्यातील वैद्यकीय संशोधनाकरिता मनुष्यबळ विकास विभागाने आर्थिक सहाय्य उपलब्ध करुनही वैद्यकीय महाविद्यालयाने संशोधनात अभिरुची न दाखविण्याबाबत**

**(४८) ६५०१८ (१७-०९-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास विभागाने ३० लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिल्यानंतरही गेल्या दोन महिन्यांमध्ये राज्यातील १५ पैकी एकाही शासकिय वैद्यकीय महाविद्यालयाने अथवा तेथील अध्यापकांनी संशोधनात अभिरुची दाखविली नसल्याबाबतची माहिती माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,रुपये ३० लाखांचे आर्थिक सहाय्य उपलब्ध असतानाही एकाही महाविद्यालयाने यात अभिरुची न दाखविण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, वैद्यकीय संशोधनाबाबत शासनाने कोणते धोरण ठरविले आहे वा ठरविण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-११-२०१६) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) लागू नाही.
(४) लागू नाही.

---

**खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशाबाबत**

**(४९) ६५०२६ (१७-०९-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेऊन डॉक्टर होण्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या सीईटी परीक्षेच्या गुणवत्तेवर वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी शासनाच्या नियमावलीनुसार प्रवेश दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालये एमबीबीएस, एम.एस.व एम.डीच्या जागेवर प्रवेश देण्यासाठी मोठी रक्कम घेत असतात, अशी तक्रार महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेन्स डॉक्टर (मार्ड) तर्फे राज्याचे मा.वैद्यकीय शिक्षणमंत्री यांचेकडे दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास पत्राद्वारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील खाजगी महाविद्यालयात एमबीबीएस, एम.एस. व एम.डी च्या जागेवर प्रवेश घेणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-११-२०१६) :**(१) होय, राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सीईटी परीक्षेच्या गुणवत्तेनुसार प्रवेश दिलेला आहे. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार नीटद्वारे खाजगी/अभिमत वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश दिलेले आहेत.

(२) होय.

(३) महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, दिनांक १७ ऑगस्ट, २०१६ अन्वये कायदा करण्यात आलेला आहे. सदर कायद्यांतर्गत प्रवेशाचे नियमाबाबत राजपत्रात अधिसूचनाही निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धमधम (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील जिल्हा परिषदेतील प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांच्या गैरवर्तनाबाबत**

**(५०) ६६८६८ (१९-११-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धमधम (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील जिल्हा परिषदेतील प्राथमिक शाळेला गट शिक्षणाधिकारी यांनी अचानक भेट दिली असता मुख्याध्यापक हे कोणतीही रजा न घेता अनधिकृतपणे शाळेत अनुपस्थित राहून गैरवर्तन करीत असल्याचे निदर्शनास आल्याचे शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांसह २१ पंचांच्या स्वाक्षरीने केलेल्या पंचनाम्याद्वारे सदर माहिती दिनांक ४ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मुख्याध्यापक व शिक्षक यांची  चौकशी केली असता शाळेच्या वेळेत पत्ते खेळणे, दारु पिणे असे गैरप्रकार सतत होत असल्याचे निदर्शनास आले,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार गैरवर्तन करणाऱ्या मुख्याध्यापकावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१२-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) पंचानामा व चौकशीअंती अनियमितता आढळून आली असून, संबंधित मुख्याध्यापक व सह शिक्षक यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्या दिनांक २६.९.२०१६ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच विभागीय चौकशीचे कार्यवाही सुरु केलेली आहे.

तसेच अन्य एक सह शिक्षिका यांच्याविरुध्द विना परवानगी गैरहजर राहिल्याबाबत विभागीय चौकशीची प्रक्रिया सुरु केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.